



# दैनिक अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : २०२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.०५ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## समतेसाठी झगडणारे निर्भीड लेखणीचे योद्धा डॉ.रणजीत मेश्राम काळाच्या पडद्याआड



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, नागपूर :** नागपूर येथील प्रखर, निर्भीड आणि तत्त्वनिष्ठ पत्रकार तसेच ज्येष्ठ साहित्यिक डॉ. रणजीत मेश्राम यांच्या आकस्मिक निधनाने शहरासह सामाजिक, साहित्यिक आणि पत्रकारिता क्षेत्रात शोककळा पसरली आहे. त्यांच्या जाण्याने समाजाचे मोठे आणि अपूरणीय नुकसान झाले असल्याची भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे. त्यांनी आपल्या पत्रकारितेच्या प्रवासात नेहमीच सत्य, न्याय आणि समाजहिताच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. सत्तेच्या दबावाला वा कोणत्याही प्रलोभनाला न जुमानता त्यांनी निर्भीडपणे भूमिका मांडली. वंचित, शोषित आणि गरजू घटकांचा आवाज बनून त्यांनी अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली. त्यांच्या लेखणीने अन्यायाविरुद्ध लढा दिला आणि जनतेच्या प्रश्नांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

निशब्द करणारी ही दुःखद घटना, आदरांजली वाहण्याचंही धाडस होत नाही. समतेसाठी धगधगणारं वादळ आज शांत झालं. समाजाने आज एक सच्चा मानवतावादी, चळवळीचा निष्ठावान सिपाही गमावला. अत्यंत अभ्यासू विचारवंत, परखड वक्ते आणि क्रांतिकारी लेखणीचे धनी असलेले डॉ.रणजीत मेश्राम यांनी आयुष्यभर आपली लेखणी व्यवस्थेतील विसंगतींविरुद्ध, अन्यायाविरुद्ध आणि सत्याच्या बाजूने निडरपणे चालवली. त्यांच्या विचारांत धार होती, शब्दांत ज्वाला होती आणि भूमिका नेहमीच ठाम व तत्त्वनिष्ठ असायची. त्यांनी पत्रकारिता केवळ व्यवसाय म्हणून नाही, तर सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन म्हणून जगली. साहित्य क्षेत्रातही त्यांनी आपल्या वैचारिक लेखनातून समाजमनाला विचार करायला भाग पाडले.

वंचित, शोषित आणि उपेक्षितांच्या हक्कांसाठी त्यांनी अखंड लढा दिला. त्यांच्या लेखणीतून समाजजागृतीची मशाल प्रज्वलित झाली आणि अनेकांना लढण्याची प्रेरणा मिळाली. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीच भरून निघणार नाही; ही समाजासाठी अत्यंत मोठी आणि न भरून निघणारी हानी आहे. पत्रकारितेबरोबरच समाजकार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग होता. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी विविध उपक्रमांद्वारे जनजागृतीचे कार्य केले. त्यांच्या विचारांमुळे आणि कार्यपद्धतीमुळे त्यांनी पत्रकारितेत आणि साहित्यविश्वात स्वतंत्र व ठळक ओळख निर्माण केली.

डॉ. रणजीत मेश्राम यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून निघणे कठीण आहे. त्यांच्या कार्याची प्रेरणा पुढील पिढ्यांना मार्गदर्शक ठरेल, अशीच अपेक्षा व्यक्त होत आहे. या दुःखद प्रसंगी दिवंगत आत्म्यास साश्रुनयनांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून ईश्वरचरणी प्रार्थना करण्यात येत आहे की, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो आणि त्यांच्या परिवारियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, हीच प्रार्थना.

## सस्पेन्स संपला! मविआकडून राज्यसभेसाठी शरद पवार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, मुंबई :** महाविकास आघाडीकडून राज्यसभा निवडणुकीसाठी शरद पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं आहे. याबद्दलची घोषणा काँग्रेस नेत्यांच्या उपस्थितीत शरद पवार यांच्या कन्या आणि राष्ट्रवादी काँग्रेस शपच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली. यावेळी त्यांनी महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांचे आभार मानले. राज्यसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. शरद पवार रिंगणात उतरल्यानं राज्यसभेची निवडणूक बिनविरोध होण्याची दाट शक्यता आहे.

राज्यातील राज्यसभेच्या ७ जागा रिक्त होत आहेत. यातील ४ जागा महाविकास आघाडीच्या आहेत. मविआच्या ४ खासदारांचा कार्यकाळ २ एप्रिलला संपणार आहे. एकूण ७ जागांसाठी १६ मार्चला मतदान होईल. महाविकास आघाडीकडे केवळ १ जागा जिंकण्याइतकं संख्याबळ आहे. मविआत शिवसेना उबाठाचे २०, काँग्रेसचे १६ आणि राष्ट्रवादी शपचे १० आमदार आहेत. त्यांची बेरीज ४६ च्या घरात जाते. राज्यसभेची १ जागा जिंकण्यासाठी ३७ मतांची गरज आहे.

काँग्रेस नेत्यांच्या उपस्थितीत खासदार सुप्रिया सुळेंनी शरद पवारांच्या नावाची घोषणा केली. राज्यसभेसाठी शरद पवारांच्या नावाला पाठिंबा दिल्याबद्दल त्यांनी काँग्रेस, शिवसेना उबाठाच्या नेत्यांचे आभार मानले. 'महाविकास आघाडीतील पक्षांची साथ कायम राहणार आहे. आम्ही पूर्ण ताकदीनं एकमेकांना साथ देऊ. काँग्रेस, शिवसेना उबाठाच्या नेत्यांनी मोठं मन दाखवलं, त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे,' असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, वरिष्ठ नेते विजय वडेट्टीवार, बंटी पाटील यावेळी उपस्थित होते. पण शिवसेना उबाठाचा एकही नेता पत्रकार परिषदेला हजर नव्हता. या गैरहजेरीबद्दल सुळे यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर खासदार संजय राऊत आताच शरद पवारांना सिल्व्हर ओकवर येऊन भेटून गेले. त्यांनी तब्येतीची विचारपूस केली. उद्धव ठाकरेंनी उमेदवारीला पाठिंबा दिला. त्याबद्दल मी त्यांची



आभार आहे, असं सुळे म्हणाल्या.

शरद पवार निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्यानं ही निवडणूक बिनविरोध होण्याची दाट शक्यता आहे. पवारांच्या व्यतिरिक्त अन्य उमेदवार असता, तर भाजप प्रणित महायुतीकडून अतिरिक्त उमेदवार देऊन मविआची मतं फोडली जाण्याची शक्यता होती. विशेषत: काँग्रेस, शिवसेना उबाठाचा उमेदवार रिंगणात असता, तर मतांची फाटाफूट करण्याचे प्रयत्न झाले असते. तशी चर्चा गेल्या आठवड्यापासून सुरु होती.

शरद पवारांच्या संसदीय कारकिर्दीला ५९ वर्षे पूर्ण झाली आहेत. या कालावधीत ते विधानसभा, लोकसभा, राज्यसभेवर अनेकदा निवडून गेले आहेत. विशेष म्हणजे या कालावधीत ते एकही निवडणूक हरलेले नाहीत. ते दोनदा राज्यसभेवर गेले आहेत. दोन्ही वेळा त्यांची निवड बिनविरोध झालेली आहे. त्यामुळे यंदाही पवार हाच ट्रॅक रेकॉर्ड कायम राखणार का, याची उत्सुकता आहे.

## पुणे शहरात गुंगीकारक औषधांची विक्री करणाऱ्यावर कारवाई - गृह राज्यमंत्री कदम

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, पुणे :** पुणे शहरात विनापरवाना व डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय गुंगीकारक औषधे नशा करण्यासाठी तसेच बेकायदेशीर खरेदी-विक्रीच्या उद्देशाने औषधांचा साठा बाळगल्याप्रकरणी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

याबाबत सदस्य चित्रा वाघ यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य अभिजीत वंजारी यांनी उपप्रश्न उपस्थित केला.

राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले, या प्रकरणात पाच जणांवर आरोप निश्चित करण्यात आला असून



त्यापैकी दोघांना अटक करण्यात आली आहे. उर्वरित तीन आरोपींचा शोध सुरू आहे. तसेच या पाचही आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.जप्त करण्यात आलेली औषधे ही प्रमाणित असूनती कोणत्याही स्थानिक मेडिकल स्टोअरमधून विकत घेतलेली नाहीत.

तपासादरम्यान संबंधित औषधांचा पुरवठा बाहेरच्या राज्यातून झाल्याची माहिती पुढे आली असून पुरवठा साखळीचा तपास सुरू आहे. दरम्यान, पुणे शहरात बनावट नशेची औषधे तयार करणारी कोणतीही कंपनी आढळून आलेली नाही. पुणे शहरासह राज्यभरात अशा प्रकारच्या औषध विक्री संदर्भातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासन विभागाकडून नियमित कारवाई केली जात असल्याचे राज्यमंत्री योगेश कदम यांनी यावेळी सांगितले.

## राज्यातील २७१ डेपो सार्वसनिक-खासगी सहभागातून विकसित होणार -परिवहन मंत्री सरनाईक




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, मुंबई :** राज्यातील २७१ परिवहन डेपो सार्वजनिक-खासगी सहभाग तत्त्वावर विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या अंतर्गत चांगल्या उत्पन्नक्षम डेपोसोबत दोन ग्रामीण किंवा तालुका स्तरावरील डेपो अशा तीन डेपोचे एक पॅकेज तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे शहरी आणि ग्रामीण भागाचा समतोल विकास साधण्यावर भर देण्यात येणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

याबाबत सदस्य विक्रम काळे यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य सदाभाऊ खोत, भाई जगताप यांनी उपप्रश्न उपस्थित केला.

मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, राज्यातील बसस्थानकांवरील स्वच्छतागृहे विनामूल्य व स्वच्छ ठेवण्यासाठी स्वतंत्र कंत्राटदार नेमण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दोन महिन्यांत या योजनेची अंमलबजावणी होणार असून प्रवाशांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. प्रायोगिक तत्त्वावर ठाणे येथील खोपट आणि मुंबई विभागातील मुंबई सेंट्रल येथे चालक-वाहक विश्रांतीगृहांचे अत्याधुनिक पद्धतीने नूतनीकरण करण्यात आले आहे. त्यामध्ये वातानुकूलित व्यवस्था, बंक बेड, स्वच्छ पिण्याचे पाणी, गरम पाण्याची सोय आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.


महामंडळाला पूर्वी जाहिरात व इतर स्रोतांमधून वर्षाला सुमारे २२ कोटी रुपये उत्पन्न मिळत होते. मात्र नव्या निविदा प्रक्रियेनंतर पुढील पाच वर्षांत सुमारे २५० कोटी रुपये उत्पन्न मिळणे अपेक्षित असल्याचे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.

## मिहान प्रकल्पातून १.२७ लाखांहून अधिक रोजगार निर्मिती - मंत्री आशिष शेलार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, नागपूर :** नागपूर येथील मल्टी मॉडेल इंटरनॅशनल कार्गो हब अँड इम्पोर्ट (मिहान) प्रकल्प हा राज्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आणि महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. एसईझेड आणि नॉन-एसईझेड क्षेत्रांचा समावेश असलेल्या या प्रकल्पात आतापर्यंत १२० कंपन्यांनी गुंतवणूक केली असून त्यापैकी ९० कंपन्यांचे काम प्रत्यक्ष सुरू आहे. या प्रकल्पामुळे आतापर्यंत १,२७,२२५ रोजगारांची निर्मिती झाली असल्याची माहिती मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विधान परिषदेत दिली.

विधान परिषद सदस्य कृपाल तुमाने यांनी नागपूर जिल्ह्यातील मिहान प्रकल्पासंदर्भात प्रश्नोत्तराच्या तासात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री ॲड. शेलार म्हणाले की, प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत राज्य शासनाने कायद्याच्या चौकटीत सकारात्मक भूमिका घेतली असून जमीन, मोबदला, वाढीव भरपाई, घरबांधणी खर्च, प्लॉट आणि घरबांधणीसाठीची आर्थिक मदत यांसारख्या सुविधा दिल्या जात आहेत.



१२.५ टक्के विकसित भूखंडाचा पर्याय स्वीकारलेल्या ३६० प्रकल्पग्रस्तांना ९ एप्रिल २०२५ च्या शासनपत्रानुसार पात्र ठरविण्यात आले आहे. या भूखंडांसाठी विकास शुल्क आकारले जात असून, पूर्वी प्रति चौ.फुट रुपये ६४ असलेले शुल्क कमी करून रुपये ५० प्रति चौ.फुट करण्यात आले असल्याची माहितीही मंत्री ॲड शेलार यांनी दिली.

काही प्रकल्पग्रस्तांनी शुल्क भरण्यासाठी मुदतवाढ मागितल्याने त्यांना ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मिहानमधील कंपन्यांमध्ये स्थानिकांना संधी मिळावी यासाठी प्रशिक्षण व्यवस्था करण्यात आली आहे. पाच टक्के आरक्षणाच्या अंतर्गत नोकरीसाठी पात्र प्रकल्पग्रस्तांना प्रमाणपत्रे देण्यात आली असून ती पुढील पिढीसाठी हस्तांतरणीय (ट्रान्सफरेबल) करण्यात आली असल्याचेही मंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले.

## पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदांवर लवकरच पदभरती - पशुसंवर्धन मंत्री मुंडे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, मुंबई :** पशुसंवर्धन विभागातील नवीन आकृतीबंध ऑक्टोबर २०२४ मध्ये मंजूर झाल्यामुळे काही संवर्गातील पदसंख्या वाढली आहे. पदभरतीची प्रक्रिया गतीने सुरू असून पुढील अधिवेशनापर्यंत मोठ्या प्रमाणात भरती प्रश्न मार्गी लागेल, असा विश्वास पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी विधान परिषदेत व्यक्त केला.

विधान परिषद सदस्य संजय खोडके यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना मंत्री मुंडे म्हणाल्या की, वाढीव पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) सोबत सातत्याने पत्रव्यवहार करण्यात आला आहे. त्यानुसार २५ एप्रिल २०२५ रोजी




एलडीओ (पशुवैद्यकीय विकास अधिकारी) पदांची जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. तसेच १२ ऑगस्ट रोजी वर्ग-एक दर्जाच्या सहा सहाय्यक आयुक्त पदांची जाहिरातही काढण्यात आली आहे.

परीक्षेसाठी पेपर सेटिंग प्रक्रियेसाठी तज्ज्ञ अधिकारी व प्राध्यापकांची नियुक्ती आवश्यक असून पेपर सेटिंगचे काम पूर्ण होताच परीक्षा घेण्यात येईल, असेही मंत्री मुंडे यांनी सांगितले. त्याचबरोबर, एमपीएससीकडूनही भरती प्रक्रियेला गती देण्याचे आश्वासन देण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

पशुपर्यवेक्षकांची पदे जिल्हा परिषदेमार्फत भरण्यात येणार असून त्याबाबत सामान्य प्रशासन विभागाशी चर्चा झाली आहे. नवीन आकृतीबंधानुसार वाढलेल्या पदांची भरती अपरिहार्य आहे. त्यानुसार सर्व प्रक्रिया सुरू असून पुढील अधिवेशनापर्यंत मोठ्या प्रमाणात पदभरती पूर्ण होईल, असे मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

अक्षराज



# जम्मू काश्मीर संघाची ऐतिहासिक कामगिरी



भारतीय क्रिकेटमधील सर्वात प्रतिष्ठेची आणि सर्वात मोठी समजली जाणारी देशांतर्गत क्रिकेट स्पर्धा म्हणजे रणजी करंडक क्रिकेट स्पर्धा. दरवर्षी ही स्पर्धा जिंकण्यासाठी देशातील सर्व राज्यातील खेळाडू जीवाचे रान करतात. आजवर या स्पर्धेत मुंबई, कर्नाटक, दिल्ली, कोलकाता, चेन्नई, सौराष्ट्र या संघाचे वर्चस्व राहिले आहे.

मुंबईने तर सर्वाधिक वेळा ही स्पर्धा जिंकून या स्पर्धेवर आपले एकहाती वर्चस्व सिद्ध केले आहे त्यामुळे यावर्षीही मुंबईच ही स्पर्धा जिंकेल असा कयास बांधला जात होता. मुंबईचे खेळाडूही फॉर्मात होते पण उपउपान्त्य फेरीत कर्नाटकने मुंबईला अनपेक्षित धक्का देत मुंबईला स्पर्धेबाहेर ढकलले. मुंबई विजेपदाच्या शर्यतीतून बाहेर पडल्यावर कर्नाटकच ही स्पर्धा जिंकेल असे वाटत होते. कर्नाटकनेही त्या दृष्टीने दमदार पाऊल टाकत अंतिम फेरीत धडक मारली. अंतिम फेरीत त्यांच्यासमोर होता तो जम्मू काश्मीर सारखा दुबळा संघ. जम्मू काश्मीर हा या स्पर्धेतील सर्वात दुबळा संघ समजला जात होता.

त्यांच्या संघात एकही आंतरराष्ट्रीय खेळाडू नसल्याने त्यांच्या संघाला ग्लॅमरही नव्हते शिवाय हा संघ पहिल्यांदाच रणजी करंडकाच्या अंतिम फेरीत पोहचल्याने त्यांना विजेतेपदासाठी कोणीही पसंती दिली नाही. कर्नाटक हा संघ जम्मू काश्मीरपेक्षा कैक पटीने बलवान होता त्यामुळे कर्नाटकच ही स्पर्धा जिंकेल असा कयास बांधला जात असताना जम्मू काश्मीरने भारतीय क्रिकेट जगताला आश्चर्याचा धक्का दिला आणि कर्नाटकला धोबीपछाड देत रणजी करंडकावर आपल नाव कोरत इतिहास घडवला आणि भारतीय क्रिकेट जगताला आश्चर्याचा धक्का दिला. रणजी करंडकाच्या अंतिम फेरीत जम्मू काश्मीरने पहिल्यांदा फलंदाजी करत ५८४ धावांचा डोंगर उभारला. या धावा काढताना जम्मू काश्मिरच्या फलंदाजांनी मोठ्या भागीदारीवर भर दिला. त्यांच्या फलंदाजांनी संयमी फलंदाजी केली. त्यांच्या गोलंदाजांनीही अप्रतीम गोलंदाजी करत कर्नाटकला पहिल्या डावात २९३ धावात रोखले. पहिल्या डावात मोठी आघाडी घेतल्याने जम्मू काश्मीर हा रणजी करंडकाचा नवा विजेता असेल हे स्पष्ट झाले आणि झालेही तसेच जम्मू काश्मीर संघ रणजी करंडकाचा नवा विजेता ठरला आणि इतिहास घडला. अर्थात हा इतिहास एका रात्रीत घडला असे नाही तर त्यासाठी या संघाने गेल्या अनेक महिन्यांपासून तयारी केली होती. ही स्पर्धा जिंकण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले. संपूर्ण स्पर्धेत हा संघ एका कुटुंबाप्रमाणे खेळताना दिसला. त्यांचा कर्णधार पारस डोगराने संपूर्ण संघाला एकसंध ठेवताना आघाडीवर राहून संघाचे नेतृत्व केले. त्याने या स्पर्धेत सर्वाधिक धावा काढल्या आणि आपल्या संघाला विजेतेपद मिळवून दिले. संपूर्ण स्पर्धेत त्याने आपल्या नेतृत्व गुणांची चमक दाखवली. त्यांचा गोलंदाज अकिब नबी दर हा तर या स्पर्धेचा हिरो ठरला. संपूर्ण स्पर्धेत अप्रतिम गोलंदाजी करून त्याने प्रतिस्पर्धी फलंदाजांना जेरीस आणले. निर्णायक सामन्यात त्याने मोक्याच्या वेळी बळी मिळवून आपल्या संघावरील दबाव कमी करत प्रतिस्पर्धी संघावर दबाव आणला. अंतिम सामन्यात तोच सामनावीर ठरला. जम्मू काश्मीर संघाचा हा विजय ऐतिहासिक असाच आहे. जम्मू काश्मीर संघाचा हा विजय केवळ क्रीडा कामगिरी नाही तर संघर्षातून उभे राहण्याची प्रेरणादाई कहानी आहे. भौगोलिक, सामाजिक आणि पायाभूत अडचणींवर मात करत जम्मू काश्मिरच्या खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर आपली ताकद सिद्ध केली. या विजयाने त्यांनी सिद्ध केले की प्रतिभा केवळ मोठ्या शहरातच असते नाही तर छोट्या शहरात अगदी ग्रामीण भागातही प्रतिभा दडली असते. फक्त या प्रतिभेला योग्यवेळी संधी मिळणे गरजेचे आहे. ही संधी मिळण्यास या भागातील खेळाडूही देशाला अभिमान वाटेल अशी दैदिप्यमान कामगिरी करू शकतात. जम्मू काश्मिरची ही कामगिरी अन्य छोट्या पण दुर्लक्षित संघासाठी प्रेरणादाई तर आहेच पण भारतीय क्रिकेटसाठीही नवी दिशा देणारी आहे. रणजी करंडक जिंकून इतिहास घडवणाऱ्या जम्मू काश्मीर संघाचे मनापासून अभिनंदन!

# तुकोबारायांचे क्षात्रतेज !



५ मार्च या दिवशी असलेल्या 'तुकाराम बीज' च्या निमित्ताने त्यांच्याच जीवनातील एक प्रसंग आपण पाहूया. 'नाठाळाच्या माथी हाणू काठी !' असा उपदेश देऊन दुर्जनांविरुद्ध लढण्यास शिकवणाऱ्या संत तुकाराम महाराजांच्या क्षात्रतेजाची ओळख या प्रसंगातून आपल्याला होईल.

तुकोबांची कीर्ती ऐकून शिवाजी महाराजांना त्यांच्या दर्शनाची ओढ लागली. श्रावण मासात तुकोबांच्या कीर्तन-श्रवणाचा लाभ घेण्याच्या उद्देशाने शिवाजीराजे तुकोबांच्या राहात्या ठिकाणी आले. तुकोबांच्या दर्शनाने ते धन्य झाले आणि कीर्तन-श्वणात दंग होऊन तेथेच ते तळ ठोकून राहिले. ही वार्ता चाकणात यवनी सेनापतीला समजताच शिवाजीराजांना धरण्यासाठी किंवा मारण्यासाठी त्याने दोन सहस्र पठाणांची सेना पाठवली. हे वृत्त शिवाजीराजांना कळले, तेव्हा ते कीर्तनास बसले होते. शिवबांनी लगबगीने तुकोबांची आज्ञा मागितली, तेव्हा तुकोबांस अतिशय दुःख झाले. आपल्या कीर्तनात असे विघ्न आलेले पाहून त्यांना मरणप्राय वेदना झाल्या. त्यांनी आपल्या भक्ताचे रक्षण करण्यासाठी पांडुरंगाचा धावा चालू केला. तेव्हा पांडुरंगाने अभय दिले. चमत्कार काय घडला, यवन सेनेला तुकोबांच्या कीर्तनात बसलेले सर्व श्रोते शिवजीराजांसारखेच दिसू लागले. तेव्हा सर्व श्रोत्यांचा संहार करण्याचे त्याने ठरवले; पण तेवढ्यात शिवबांचे रूप घेऊन पांडुरंग तेथून बाहेर पडले, तेव्हा यवन सेनेतील हेरांनी तोच शिवाजी असल्याचे सेनापतीस सांगितले.

सर्व पठाण सैन्य सेनापतीसह पाठीशी आणि शिवाजीरूपी पांडुरंग पुढे अशी स्पर्धा लागली. शिवबारूपी पांडुरंगानी पठाण सैन्यास हुलकावणी देत चकवत २० कोस दूर नेले आणि दाट अरण्यात काट्याकुट्यात सूर्यास्ताच्या वेळी सकळ सैन्यास अडकवून ते गुप्त झाले. काटेकुटे लागून रक्तबंबाळ झालेल्या अवस्थेत यवनी सैन्याचे कपडे आणि कातडी फाटून अंधारात वाट चुकून ते भटकू लागले; पण शिवबा (शिवबारूपी पांडुरंग) त्यांच्या हाती लागले नाही. इकडे तुकोबांच्या कीर्तनात शिवबा आनंद उपभोगत पहाटेपर्यंत बसून राहिले. आरती झाल्यावर प्रसाद आणि तुकोबांचे आशीर्वाद घेऊन सुरक्षितपणे सिंहगडावर पोहोचले.

**तात्पर्य :** संत तुकारामांनी स्वतःची बायाको-मुले उपाशी असतांना पांडुरंगाचा कधीही धावा केला नाही; पण क्षात्रधर्माचे प्रतिरूप असलेल्या छ. शिवाजी महाराजांचे रक्षण करण्यासाठी आयुष्यात एकदाच आणि शेवटचा धावा केला; कारण त्यांना ठाऊक होते की, शिवाजी महाराजच हिंदवी राज्याची स्थापना करू शकतात.

**(साभार : सनातन डॉट ऑर्ग)**

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# भटकी कुत्री ... एक ज्वलंत प्रश्न



महाराष्ट्राचे पशुसंवर्धन व दुग्धविकास खात्याचे सचिव रामास्वामी ए यांनी अलीकडे कुत्र्यांची संख्या कमी करण्यासाठी एक उपाय सुचविला आहे. ट्रान्स व्हॅजिनल लेप्रोस्कोपिक ओव्हेरि अकोटॉमी चा वापर केला पाहिजे असे सुचविले आहे. हे नुकतेच वाचनात आले. नागपूर येथे भरलेल्या राष्ट्रीय स्तरावरील परिषदेत त्यांनी हा उपाय सुचविला आहे. महाराष्ट्रात सुमारे १७ लाख भटकी कुत्री आहेत.

सुमारे ९.७ लाख कुत्र्यांनी चावा घेतल्याची प्रकरणे नोंदविण्यात आली आहेत. देशात दरवर्षी रेबीज मुळे सुमारे १८००० ते २०००० एवढी माणसे मरतात. विशेष म्हणजे यात सुमारे ६० टक्के मुले आहेत. महाराष्ट्रात मोठ्या संख्येने शहरीकरण झालेले आहे. त्यामुळे कुत्र्यांची संख्या जास्त आहे. एकट्या पुणे शहर व त्याच्या आजूबाजूच्या भागात ४ लाखावर भटकी कुत्री आहेत.

कुत्र्याची नसबंदी करण्यासाठी त्यांना चार पाच दिवस पाळावे लागते. ते लहान नगरपालिकांना परवडण्यासारखे नाही. गेल्या सहा वर्षात महाराष्ट्रात कुत्र्याच्या चाव्याच्या सुमारे ३० लाखाहून अधिक घटना घडल्या आहेत. २०२१ ते २०२३ या वर्षाच्या काळात रेबीज मुळे ३० लोक मृत्युमुखी पडले आहेत. ऑगस्ट २५ मध्ये सुप्रीम कोर्टाने प्राण्यांचे जन्म नियंत्रण व आणि रेबीज विरोधी लशीकरण मोहिमांचे आदेश दिले होते. एकूणच भटकी कुत्री हा नागरिकांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे.

**-शांताराम वाघ, पुणे.**

# विघातक

ए आय तंत्रज्ञान पहा
ठरूलागले विघातक
बॉम्ब हल्ला अचूकते
रे शस्त्रअजस्त्र घातक

एकाचं वेळी कपाळी
बसवलेसहस्त्र पातक
काय शोध हा लावला
अस्वस्थझाले स्नातक

प्रगति गति वा-यासम
बुध्दीमत्तेचे हे द्योतक
जन कल्याण साधाया
संशोधक कसे आर्तक

शोधाचेकारण आगळे
इप्सित साधी प्रवर्तक
उलटाप्रकार आचरणी
चिंतातूर भविष्यवर्तक

मृत्यू तांडव ओढवू घेई
जागवून बसलो अंतक
इष्ट हेतु सहजते साध्य
सुखावले अनिष्टचिंतक

कायझाली चुककळेना
बनवे अधोगति पुस्तक
आता विध्वंस तुझाकरे
रे दारावर देतोयं दस्तक

आपल्याच रे विद्रोहाचा
आपणचं घडलो हस्तक
उशीरा झाला फस्तावा
का दिले देवा हे मस्तक

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# मळकटलेले चारित्र्य आणि कपडे मात्र भारी

आमच्या लहानपणी दूरदर्शनवर एक जाहिरात नेहमी येत असे. सूटबुटातील लोक आवडीने माणिकचंद गुटखा खाताना दिसायचे आणि निवेदक सांगायचा...उंचे लोगों की उंची पसंद,माणिकचंद!आणि लगेच वैधानिक इशारा दिला जायचा. धूम्रपान करना या गुटखा तमाखू चबाना सेहत के लिये हानिकारक होता हैं!म्हणजे याचा अर्थ स्पष्ट होता की व्यसन कोणतेही असो ते शरीराला घातक असते.काहींना भारी भारी कपडे घालण्याची भारी हौस असते पण त्यांचे मन अनेक विकारांनी मळलेले असते.नुसते भारी व महागडे कपडे घातल्याने स्टेटस वाढत नाही.स्टेटस चारित्र्य जपल्याने वाढते.कर्तृत्वाने,कष्टाने, प्रामाणिक जीवन जगल्याने आणि समाजात मिळून मिसळून राहिल्याने स्टेटस वाढते.

हिंदी चित्रपटांतील,मालिकांतील आणि कार्यक्रमांतील कलाकार भारी भारी महागड्या कपड्यांत दाखवले जातात.पण त्यांच्या चारित्र्यावर अनेक डाग पडलेले असतात.परंतु,हिरोइन्स मात्र नेहमीच तोकड्या कपड्यांत दाखवल्या जातात याचे कारण सगळ्यांना माहीत आहे! आजकालचे कॉलेजचे पोरं पोरी आणि काही शाळकरी मुले मुली अशोभनीय कपडे घालताना दिसतात.काही नोकरदार मंडळींना भारी भारी कपडे घालण्याची हौस असते. दर महिन्याला नवीन नवीन व फॅशनेबल कपडे विकत घेणारे या जगात खूप आहेत.काहीजण तर प्रत्येक सणावाराला व इव्हेंटला न विसरता नवे नवे कपडे विकत घेतात.परंतु,आमचे शेतकरी बांधव क्वचित प्रसंगी नवे कपडे विकत घेतात.अनेक शेतकरी लेकीच्या लग्नात सुध्दा साधे कपडे घालतात. अभिमानाची गोष्ट अशी की आपले शेतकरी बांधव साध्या कपड्यात सुध्दा इतरांपेक्षा नक्कीच उजवे दिसतात. त्यांचे चारित्र्य,त्यांचे कर्तृत्व आणि त्यांचे साधे राहणीमान नक्कीच लक्षवेधक असते.

आजकाल बहुतांश स्त्रिया इतक्या साड्या विकत घेतात की त्यांच्या साड्यांनी कपाटे भरलेली असतात. पण ज्यांच्यामुळे आज रोजी आपण वैभवात राहत आहोत त्या सावित्रीबाई फुलेंच्या अंगावर, साडीवर धर्माच्या ठेकेदारांनी शेण, चिखल व दगडांचा वर्षाव केला होता.माता रमाई आंबेडकरांनी बाबासाहेबांच्या शिक्षणासाठी पैसा पुरवला पण स्वतः मात्र फाटक्या आणि ठिगळे लावलेल्या साडीत दिवस काढले होते.याचा आज आपणाला पूर्णतः विसर पडला आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर नेहमी सुटाबुटात राहायचे.कारण समाजबांधवांनीही त्यांचे अनुकरण करावे असे त्यांचे म्हणणे होते. वर्षानुवर्षे बहुजन समाज गुलामित खितपत पडला होता.गुलामीची बंधने झुगारून देऊन,साखळदंड तोडून फेकून देऊन ताठ मानेने जीवन जगण्याची प्रेरणा मिळावी म्हणून बाबासाहेब नेहमी सुटा बुटात राहायचे.बाबासाहेबांचे एकूण व्यक्तीमत्व,चारित्र्य,विचार, आचरण आणि राहणीमान आपल्या सगळ्यांसाठी अनमोल ठेवा होते.

महागडे कपडे घातल्याने कोणी मोठा ठरत नाही आणि भारी भारी कपडे नेसून मिरवल्याने स्टेटस वाढत नाही.मन शुध्द विचारांचे असले,चारित्र्य चांगले असले आणि कर्तृत्व उत्कृष्ट असले की माणूस कोणत्याही कपड्यांत शोभून दिसतो.मनात वाईट विचारांचे काहूर मातलेले असेल,चारित्र्य नेक नसेल,कर्तृत्व शून्य असेल आणि वागण्याची बोलण्याची पद्धत विचित्र असेल तर महागड्या कपड्यांतही माणूस निकृष्ट दर्जाचा वाटतो.शेवटी कपडे कसे नेसावेत व कोणत्या दर्जाचे कपडे घालावेत हे ज्याचे त्याचे स्वातंत्र्य आहे.परंतु, मळकटलेले मन,डागाळलेले चारित्र्य असेल तर नुसते भारी व महागडे कपडे घालून पदरात काहीच पडत नाही.उलट लोक भुवया उंचावून बघतात.तेव्हा कपडे कोणतेही घाला व साधे कपडेही घाला काही हरकत नाही.पण मन स्वच्छ ठेवा,चारित्र्य चकाकते ठेवा,कर्तृत्व वाढवा.चारचौघांत नक्कीच शोभून दिसाल.आणि हीच तुमची खरी ओळख असेल.

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर मो.९७३०९३९७३२.**

# होळी -रंग, संस्कार आणि नव्या सुरुवातीचा उत्सव

होळी म्हणजे फक्त रंगांची उधळण नाही, ती आपल्या संस्कृतीतील एक जिवंत परंपरा आहे. हिवाळ्याची गुलाबी थंडी मागे सारून वसंताच्या नव्या उमेदेचे स्वागत करण्याचा हा आनंदोत्सव आहे. होळीच्या ज्वालेत अहंकार, मत्सर आणि नकारात्मकता जाळून टाकण्याचा संदेश दडलेला आहे. रंगपंचमीच्या रंगांत मनं एकमेकांशी पुन्हा जुळतात आणि नात्यांना नवसंजीवनी मिळते.भारतीय संस्कृतीत सण हे केवळ आनंदाचे क्षण नसतात; ते समाजाला एकत्र बांधण्याची संधी असतात. होळी आपल्याला सांगते की जीवनात रंग हवेत, पण ते रंग प्रेमाचे, विश्वासाचे आणि मैत्रीचे असावेत. जुने वाद विसरून नव्याने सुरुवात करण्याचा हा योग्य काळ आहे. ठिकठिकाणी पेटणारी होळी ही फक्त अग्नी नसून ती सकारात्मकतेची ज्योत आहे.

हा सण अंतर्मनाच्या शुद्धीकरणाचाही संदेश देतो. जशी होलिकेच्या अग्नीत वाईटाचा नाश झाला, तशीच आपल्या जीवनातील नकारात्मक विचारांची राख होऊ दे. प्रत्येकाच्या मनात श्रद्धा, संयम आणि चांगुलपणा जागृत राहो, हीच या उत्सवाची खरी शिकवण आहे.

आजच्या धावपळीच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात आपण सोशल मीडियावर रंग उधळतो; पण प्रत्यक्ष भेटून दिलेला रंग, मनापासून केलेले आलिंगन आणि आशीर्वादाची ऊब वेगळीच असते. होळी आपल्याला नात्यांना वेळ देण्याची, संवाद वाढवण्याची आणि मनातील दुरावा दूर करण्याची आठवण करून देते.

पर्यावरणपूरक होळी साजरी करण्याचाही संदेश आपण जपला पाहिजे. नैसर्गिक रंगांचा वापर, पाण्याची बचत आणि निसर्गाचे संवर्धन यामुळे आनंदासोबत जबाबदारीही जपली जाते. सण साजरा करताना निसर्गाशी सुसंवाद राखणे हीच खरी संस्कृती आहे.

होळी म्हणजे आशेचा, ऐक्याचा आणि नव्या सुरुवातीचा उत्सव. चला, या रंगोत्सवात आपल्या नात्यांना नव्या अर्थाने उजाळा देऊया. शब्दांमधूनही रंग उधळूया आणि प्रत्येकाच्या जीवनात आनंदाची फुले फुलवूया.

**मत्सर, द्वेष, मतभेद सारे विसरू रे,**
**प्रेम, शांती, आनंद चहुकडे पसरू दे**
**होलिकेच्या अग्नित नकारात्मकता सारी जाळू रे,**
**आली होळी, होळी आली रे!**
**रंगांच्या उधळणीत नात्यांना नवा अर्थ देऊ या,**
**हास्याच्या फुलांनी प्रत्येक क्षण सजवू या**
**जुने गिले-शिकवे मागे टाकून हातात हात घेऊ या,**
**मनांच्या आकाशात आनंदाचे इंद्रधनुष्य रंगवू या**
**रंग असोत उमेदेचे,**
**स्वप्न असोत यशाचे,**
**आणि आयुष्य भरभरून जावो**
**प्रेम, विश्वास आणि आपुलकीच्या रंगांनी**
आपणांस व आपल्या परिवारास होळी व रंगपंचमीच्या हार्दिक, रंगमय शुभेच्छा!

**पत्रकार विकास दळवी**
**दैनिक अक्षराज ठाणे प्रतिनिधी**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# खासदार तटकरेंच्या आश्वासनानंतर बालगंगा प्रकल्पग्रस्तांचे बेमुदत उपोषणास तूर्तास स्थगिती

## मागण्या मान्य न झाल्यास स्वतः उपोषणाला बसणार - खासदार तटकरे




गेली १६ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या बालगंगा प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या व प्रश्न समजून घेऊन पुनर्वसन मंत्र्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधण्यात आला. सिडको अधिकारी, जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी व प्रकल्पग्रस्त शेतकरी यांची संयुक्त बैठक लावण्याचे आश्वासन तसेच लेखी पत्र खासदार सुनील तटकरे यांनी दिले. त्यांचा मान राखून आम्ही पाचव्या दिवशी उपोषणास तूर्तास स्थगिती देत आहोत.

**- संदीप पाटील (उपोषणकर्ते)**

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०४, पेण (रायगड) :** बालगंगा धरण प्रकल्पग्रस्तांच्या सुरू असलेल्या बेमुदत उपोषणाला अखेर पाचव्या दिवशी तूर्तास स्थगिती देण्यात आली. खासदार सुनील तटकरे यांच्या मध्यस्थीनंतर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी आपले उपोषण तात्पुरते मागे घेतले. पेण येथील प्रांत कार्यालयासमोर सुरू असलेल्या या उपोषणस्थळी खासदार तटकरे यांनी भेट देत आंदोलकांशी सविस्तर चर्चा केली. उच्च न्यायालयाचे आदेश, शासनाची भूमिका, पुनर्वसन कायदा, मोबदल्याचा मुद्दा तसेच सातबारा मूळ मालकांच्या नावे करण्याची मागणी या सर्व बाबींवर सखोल विचारविनिमय करण्यात आले.

यावेळी खासदार तटकरे यांनी पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा केली. शुक्रवार, दिनांक ०६ मार्च २०२६ रोजी मंत्रालयात जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, सिडको अधिकारी व प्रकल्पग्रस्त शेतकरी यांची संयुक्त बैठक आयोजित करण्याची विनंती त्यांनी केली.प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या मान्य न झाल्यास मी स्वतः शेतकऱ्यांसोबत उपोषणाला बसेन, असा ठाम इशाराही खासदार तटकरे यांनी दिला.

बैठकीत सातबारा मूळ मालकांच्या नावे करण्यासह इतर प्रलंबित मागण्यांवर सविस्तर चर्चा करून ठोस निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.बालगंगा धरण प्रकल्पामुळे बाधित शेतकरी अनेक वर्षांपासून न्याय्य हक्कांसाठी लढा देत आहेत. शासनाचे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी बेमुदत उपोषण सुरू केले होते. खासदार तटकरे यांच्या हस्तक्षेपामुळे आंदोलनाला सकारात्मक दिशा मिळाल्याचे आंदोलकांनी सांगितले. यावेळी खासदार तटकरे यांनी उपोषणकर्ते संदीप पाटील, भरत कदम, शरद जाधव, वासुदेव पाटील आणि मधुकर हादगे यांना नारळ पाणी देत उपोषण सोडवले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रवादी पेण विधानसभा अध्यक्ष नरेंद्र ठाकूर, पेण तालुका अध्यक्ष दयानंद भगत, रा जि प डी बी पाटील, व स्थानिक पदाधिकारी, प्रकल्पग्रस्त शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मेट्रो १२ च्या विस्तारात कळवा मुंब्र्यातूनही धावणार मेट्रो

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०४, कळवा (ठाणे) :** पुढील काही दिवसात ठाणे जिल्ह्याचा चेहरामोहरा बदलणार असून येत्या काळात कळवा, मुंब्रा, कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ आणि बदलापूरकरांचा प्रवास अतिशय वेगवान आणि सुखाचा होणार आहे.

ठाणे जिल्ह्यातील मेट्रो जाळ्याचा मोठा विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, यामुळे आता थेट टिटवाळा आणि बदलापूर पर्यंत मेट्रो धावणार आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांनी एमएमआरडीए मुख्यालयात घेतलेल्या एका महत्त्वाच्या बैठकीत या प्रकल्पांना गती देण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान या विस्तारामुळे मुंबई आणि नवी मुंबई गाठणे आता प्रवाशांसाठी केवळ काही मिनिटांचा खेळ ठरणार आहे.

ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो ५ मार्गिकेचा विस्तार आता अधिक व्यापक स्वरूपात केला जाणार आहे. मेट्रो ५ अ ही मार्गिका दुर्गाडी नाका ते कल्याण मार्गे उल्हासनगर आणि त्यानंतर थेट अंबरनाथ-बदलापूरच्या मध्यभागी असलेल्या चिखलोली रेल्वे स्टेशन पर्यंत नेली जाईल.इतकेच नाही तर, मेट्रो ५ ब अंतर्गत चिखलोली ते बदलापूर आणि मेट्रो ५ क च्या माध्यमातून दुर्गाडी ते थेट टिटवाळा असा आराखडा



तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

या प्रकल्पांमुळे कल्याणच्या पलीकडे राहणाऱ्या लाखो नागरिकांना ठाणे आणि मुंबईशी थेट मेट्रोच्या माध्यमातून कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. कल्याण-तळोजा मेट्रो १२ चे काम सध्या युद्धपातळीवर सुरू असून, आता या मार्गिकेचा विस्तार कळवा आणि मुंब्रा परिसरातही केला जाणार आहे. मेट्रो १२ ब या नवीन आराखड्यानुसार, ही मेट्रो शिळफाटा मार्गे मुंब्रा आणि कळवा येथून पुढे थेट ठाण्याला जोडली जाईल. यामुळे मुंब्रा-कळवा पट्ट्यातील प्रवाशांना पहिल्यांदाच मेट्रोचा पर्याय उपलब्ध होणार आहे.

तसेच, कल्याण फाटा ते दहिसर मोरी मार्गे तळोजा या मेट्रो १२ अ मार्गिकेला आधीच मंजुरी मिळाली असून त्याचे कामही प्रगतीपथावर आहे. ठाणे जिल्ह्यातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी एमएमआरडीएने एक नवा प्रयोग हाती घेतला आहे.

कल्याण लोकसभा मतदारसंघातील बहुतांश मेट्रो मार्गिका आता 'डबल डेकर' स्वरूपात असतील. यामध्ये सर्वात खाली रस्ता, त्यावर फ्लायओव्हर आणि सर्वात वरच्या स्तरावर मेट्रो मार्गिका असे या प्रकल्पांचे स्वरूप असेल. मेट्रो १२, मेट्रो १४ आणि मेट्रो ५ च्या विस्तारित मार्गिकांसोबतच शिळफाटा-रांजणोली आणि वालधुनी-नेवाळी हे उन्नत मार्गही याच पद्धतीने विकसित केले जाणार आहेत. यामुळे जमिनीचा कमीत कमी वापर करून जास्तीत जास्त वाहतूक क्षमता निर्माण केली जाईल.केवळ मेट्रोच नाही, तर रस्ते वाहतुकीतही मोठे बदल सुचवण्यात आले आहेत.

बदलापूर, अंबरनाथ, उल्हासनगर, कल्याण आणि डोंबिवली या शहरांना थेट मुंबई-नवी मुंबईशी जोडण्यासाठी एक्सेस कंट्रोल मार्गांची उभारणी केली जाणार आहे. बदलापूर-काटई मार्गावरील अनधिकृत बांधकामे हटवून रस्त्यांचे रुंदीकरण करण्याचे आदेश ही यावेळी देण्यात आले. मेट्रो १४ ही मार्गिका देखील या एक्सेस कंट्रोल रस्त्याला जोडली जाणार असल्याने, प्रवाशांना रस्ते आणि मेट्रो अशा दोन्ही माध्यमांतून जलद प्रवासाची सोय उपलब्ध होईल.

# राहुरी खुर्द ग्रामपंचायत कार्यालयाचे स्वच्छतेकडे दुर्लक्ष; लक्ष्मी माता मंदिर परिसरात कचर्याचे साम्राज्य



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०४, राहुरी (अहिल्यानगर) :** तालुक्यातील राहुरी खुर्द येथील ग्रामपंचायत प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे लक्ष्मी माता मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर कचरा साचल्याचे चित्र दिसून येत आहे. मंदिर परिसरात कचर्याचे ढिगारे पडले असून कचराकुंडीची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. परिणामी परिसरात तीव्र दुर्गंधी पसरत असून रोगराईला आमंत्रण मिळत असल्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, मागील काही दिवसांपासून नियमित कचरा उचलला जात नसल्यामुळे कचराकुंडी खराब झाल्यामुळे कचराकुंडी शेजारी मोठ्या प्रमाणावर कचरा साचत आहे. अनेक ठिकाणी कचरा रस्त्यावरच पसरलेला दिसतो.

सांडपाण्यामुळे डासांची उत्पत्ती वाढली असून मलेरिया, डेंग्यू यांसारख्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. मंदिर परिसर हा धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचा व नागरिकांची वर्दळ असलेला भाग असल्याने परिस्थिती अधिक चिंताजनक ठरत आहे. यासोबतच गावामध्ये सार्वजनिक मुतारीची कोणतीही सोय नसल्याने अनेक रस्त्याने प्रवास करणारे प्रवासी तसेच व्यापारी मंदिराच्या मागील बाजूस जाऊन लघुशंका करत आहेत. त्यामुळे मंदिर परिसरात अधिक अस्वच्छता पसरत असून दुर्गंधीची समस्या तीव्र होत आहे. भाविकांच्या धार्मिक भावना दुखावल्या जात असून महिला व ज्येष्ठ नागरिकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. लक्ष्मी माता मंदिर परिसरात दररोज भाविकांची ये-जा असते. सध्या मंदिराभोवती पसरलेल्या कचर्यामुळे भाविकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. काही ठिकाणी कुत्री व जनावरे कचर्यात भटकताना दिसत असून त्यामुळे स्वच्छतेचा प्रश्न अधिकच गंभीर झाला आहे.

दुर्गंधीमुळे परिसरातील व्यापारी व रहिवासी हैराण झाले असून लहान मुलांच्या आरोग्यावर याचा परिणाम होत असल्याची तक्रार करण्यात येत आहे.नागरिकांनी सांगितले की, ग्रामपंचायत प्रशासनाकडे अनेकदा तोंडी तसेच लेखी तक्रारी करूनही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही.

स्वच्छ भारत अभियानाच्या घोषणा फक्त कागदावरच राहिल्याची टीका होत आहे. ग्रामपंचायत कर्मचारी सुस्त, नागरिक मात्र त्रस्त अशी भावना स्थानिकांमध्ये व्यक्त करण्यात येत आहे.ग्रामपंचायतीने तातडीने कचरा व्यवस्थापनासाठी ठोस पावले उचलावीत, कचराकुंड्यांची दुरुस्ती किंवा नवीन कुंड्या बसवाव्यात, नियमित कचरा संकलन व्यवस्था सुरू करावी, तसेच परिसरात फवारणी करून निर्जंतुकीकरण करावे. तसेच सार्वजनिक मुतारीची तातडीने उभारणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा आरोग्याचा प्रश्न गंभीर बनण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची दखल घेऊन तातडीने स्वच्छता मोहीम राबवावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने दुर्लक्ष न करता जबाबदारीची जाणीव ठेवून कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

# सीए होऊन गौरवने घडवली शैक्षणिक क्रांती

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०४, ठाणे :** नुकताच सीए परीक्षेचा निकाल जाहीर झाला. यामध्ये ठाणेस्थित (मूळ गाव म्हाते खुर्द,तालुका जावली जिल्हा सातारा) रहिवाशी असलेला कै.हरीबाई ज्ञानदेव गणपत दळवी व कै.चंद्रभागा साधुराम कोंडीबा महाडीक (रा. तारगांव काळोशी) यांचा नातू कु.गौरव सुप्रिया राजेंद्र दळवी याने सीए होऊन शैक्षणिक क्रांती घडविली. लहानपणापासून अभ्यासात हुशार असलेल्या गौरवचा दहावीपर्यंतचा शैक्षणिक प्रवास इंग्रजी माध्यमातून सरस्वती हायस्कूल ठाणे येथे झाला.

इयत्ता दहावीतच गौरवने ९३ टक्के गुण मिळवून शैक्षणिक



क्षेत्रात गरुड भरारी घेण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. गौरवने पदवीपर्यंतचे शिक्षण एमसीसी महाविद्यालय मुलुंड येथून घेतले. गौरव दळवी याने सीए होण्याचे स्वप्न अथक परिश्रम घेऊन पुर्ण केले. प्रचंड इच्छाशक्ती आणि अफाट जिद्दीच्या जोरावर यश मिळविता येते हे गौरवने दाखवून दिले आहे.

गौरवचे वडील नवयुग विकास नागरी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष असून आई उच्चशिक्षित आहे. गौरवची बहीण प्रज्ञा हिने वकीलीचे शिक्षण घेतले आहे.आई, वडील, बहीण माझ्या यशाचे मानकरी असल्याचे गौरव आवर्जून सांगतो.गौरवच्या या यशाबद्दल त्याच्यावर विविध स्तरातून कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# थोडक्यात

## माथेरानमध्ये सुट्टीतही शुकशुकाट रमजान, चंद्रग्रहण व परीक्षा काळाचा परिणाम



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०४, माथेरान :** शनिवार-रविवार ची सुट्टी आणि होळी-धुळवड असूनही यंदा माथेरानमध्ये अपेक्षित पर्यटकांची गर्दी दिसून आली नाही. बाजारपेठ व पर्यटन स्थळांवर शांतता जाणवत असून व्यापारी वर्ग सीझनची वाट पाहत आहे. सध्या पवित्र रमजान महिना सुरू असल्याने अनेक कुटुंबे प्रवास टाळतात. त्यातच मंगळवारी आलेली धुळवड आणि मधल्या आठवड्यातील सुट्टीमुळे दीर्घ सहलींचे नियोजन कमी झाले.दरम्यान, मंगळवारी येणाऱ्या चंद्रग्रहण बाबत धार्मिक समजुतींमुळे काही जण घराबाहेर पडणे टाळतात, तर वैज्ञानिक दृष्टिकोनातून ही नैसर्गिक खगोलीय घटना आहे. याच काळात दहावी-बारावी व इतर परीक्षांचा हंगाम सुरू असल्याने पर्यटनावर आणखी परिणाम झाला आहे. जानेवारी ते मार्च हा काळ परंपरेने मंद समजला जातो; मात्र सण, ग्रहण आणि परीक्षा एकत्र आल्याने यंदा शुकशुकाट अधिक जाणवत आहे. व्यापारी वर्ग आगामी उन्हाळी सीझनकडून मोठ्या अपेक्षा ठेवून आहे.

## कु.आराध्या नरावाड हिची राज्यस्तरीय डॉ.होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेसाठी निवड



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०४, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी येथील रहिवासी व सध्या देगलूर येथील महात्मा फुले इंग्लिश मीडियम स्कूल मधील इयत्ता सहावीची विद्यार्थिनी कु.आराध्या साईनाथ नरवाड हिच्या Effects of Tree Plantation on Temperature Around School या नाविन्यपूर्ण वैज्ञानिक प्रयोगाची राज्यस्तरीय डॉक्टर होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा साठी निवड झाली आहे. येत्या १५ मार्च रोजी मुंबई येथे होणाऱ्या अंतिम फेरीत आराध्या आपला प्रयोग सादर करणार आहे. आराध्याने या स्पर्धेतील थेअरी आणि प्रॅक्टिकल असे दोन्ही टप्पे अत्यंत यशस्वीरीत्या पूर्ण केले आहेत. शालेय परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड केल्यास आजूबाजूच्या परिसरातील तापमान नियंत्रणात ठेवण्यास कशी मदत होते, हे तिने प्रत्यक्ष प्रयोगांद्वारे सिद्ध केले आहे. तापमानातील बदल, सावलीचा परिणाम, आर्द्रतेतील फरक आणि उष्णतेची तीव्रता यांचा अभ्यास करून तिने शास्त्रीय पद्धतीने निष्कर्ष मांडले आहेत.स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात आराध्याने नांदेड येथील विविध शाळांना भेटी देत आपला प्रयोग सादर केला. यात Oxford The Global School, Sri Chaitanya School तसेच Shakuntala The School for Excellence या शाळांचा समावेश आहे. या ठिकाणी तिने शिक्षक व विद्यार्थ्यांसमोर वृक्षलागवडीचे महत्त्व आणि तापमान नियंत्रणातील त्याची भूमिका प्रभावीपणे मांडली. या भेटीदरम्यान ऑक्सफर्ड ग्लोबल स्कूलच्या वाणी तसेच श्री चैतन्य स्कूलच्या पूजा माने यांचे तिला मोलाचे मार्गदर्शन लाभले. आराध्याला नांदेडमधील वृक्षमित्र फाउंडेशन सोबत कार्य करण्याचा अनुभव असून या संस्थेचे संतोष मुगटकर यांचे तिला विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच तिने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथील भूविज्ञान विभागाला भेट देऊन विभागप्रमुख डॉ. वाघ यांचे ही मार्गदर्शन घेतले. या शास्त्रीय मार्गदर्शनामुळे तिच्या प्रयोगाला अधिक भक्कम आधार मिळाला. विविध शाळा व संस्थांना दिलेल्या भेटीदरम्यान आराध्याने तापमानवाढ, उष्णतेच्या लाटा (Heat Waves) आणि त्याचे होणारे दुष्परिणाम याविषयी विद्यार्थ्यांना व नागरिकांना सविस्तर माहिती दिली. तसेच वृक्षलागवड हीच तापमानवाढीच्या समस्येवर प्रभावी उपाय ठरू शकते, हे तिने प्रत्यक्ष प्रयोगांद्वारे दाखवून दिले. येत्या १५ मार्च रोजी मुंबई येथे आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेत आराध्या आपला प्रयोग सादर करणार असून तिच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, मार्गदर्शक, पालक आणि समाजातील सर्व स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. देगलूरच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी ही अभिमानाची बाब मानली जात आहे.

## देशाच्या पोलाद उत्पादनाचे उद्दिष्ट गाठताना स्थानिक पर्यावरणाचा बळी दिला जाऊ नये - खा.धानोरकर



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, चंद्रपूर :** 'देशाचे पोलाद उत्पादनाचे लक्ष्य गाठताना स्थानिक पर्यावरणाचा आणि नागरिकांच्या आरोग्याचा बळी दिला जाऊ नये. कोळसा धुलाई केंद्राची (वॉशरी) कार्यक्षमता तातडीने सुधारुन प्रदूषणावर नियंत्रण मिळविणे ही काळाची गरज आहे,' अशी ठाम भूमिका खा. प्रतिभा धानोरकर यांनी मांडली.नवी दिल्ली येथील संसदीय सौध विस्तार भवन, समिती कक्ष 'डी' मध्ये आयोजित कोळसा, खाण व पोलाद विषयक स्थायी समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. या बैठकीत त्यांनी कोकिंग कोलची उपलब्धता वाढविणे आणि आयातीवरील अवलंबित्व कमी करण्याबाबत केंद्र सरकारला महत्वाचे निर्देश दिले. या बैठकीत खा. प्रतिभा धानोरकर यांनी कोकिंग कोल वॉशिंग क्षमतेचा केवळ ५० टक्के वापर होत असल्याबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. २०३० पर्यंत ३०० एमटीपीए पोलाद उत्पादनाचे लक्ष्य गाठण्यासाठी ४८ एमटी 'वॉशड् कोल' ची आवश्यकता आहे.

मात्र, भोजूडीह वॉशरी सारख्या महत्वाच्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीत होणारा विलंब विकासाला खीळ घालत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. या विलंबासाठी जबाबदार कंत्राटदारांवर काय कारवाई केली, याचा जाब त्यांनी मंत्रालयाच्या प्रतिनिधींना विचारला. तसेच, सुधारित इपीसी मॉडेलमुळे वॉशरी टेंडर्समध्ये पारदर्शकता आणून कामे वेगाने पूर्ण करण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. बैठकीदरम्यान खा. प्रतिभा धानोरकर यांनी स्थानिक शेतकरी आणि पर्यावरणाचा मुद्दा लावून धरला. कोळसा धुलाई प्रक्रियेमुळे हवेत पसरणारे सूक्ष्म धुलिकण आणि त्याचा शेतीवर होणारा विपरित परिणाम रोखण्यासाठी कोल इंडियाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली.